



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे    सहसंपादक : तुकाराम कामठे






वर्ष ५ । अंक १४९ । गुरुवार २६ फेब्रुवारी २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322


# महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी विशाल नाकाडे, विकास जगताप, रेवनाथ पवार, रवींद्र बारस्कर, बाबासाहेब नागरगोजे यांची बिनविरोध निवड

**अहिल्यानगर मनपेत स्थायी व महिला बालकल्याण समिती सदस्यांची निवड जाहीर - सर्व पक्षांचा समावेश । महापौर ज्योती गाडे यांच्या अध्यक्षतेखाली सभेचं आयोजन ; स्थायी समितीत नव्या-जुन्यांचा मेळ । काँग्रेस, एमआयएमलाही मिळाली इंट्री - भाजप, राष्ट्रवादी, शिंदेसेना गटांमध्ये रंगला राजकीय समतोल**











**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत आज (दि. २६ फेब्रुवारी) स्वीकृत नगरसेवकपदी भाजपाच्या कोट्यातून विशाल नाकाडे, रवींद्र बारस्कर, राष्ट्रवादीकडून विकास जगताप, रेवनाथ पवार, बाबासाहेब नागरगोजे यांची बिनविरोध निवड झाली तर शिवसेनेकडून आदेश सुरेश जाधव यांचा अर्ज कागदपत्रे अर्धवट असल्याने फेटाळला. शपथपत्र नसल्याने अर्ज रद्द. पुढच्या सभेत त्याच पक्षाच्या कोट्यातून नियुक्ती होईल. असे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

दरम्यान स्थायी समिती व महिला–बालकल्याण समितीच्या सदस्यांची निवड जाहीर करण्यात आली. महापालिकेच्या राष्ट्रमाता जिजाऊ सभागृहात झालेल्या या सभेला महापौर ज्योतीताई गाडे अध्यक्षस्थानी होत्या, तर आयुक्त यशवंत डांगे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते प्रकाश भागानगरे, भाजपचे शारदाताई ढवण, शिवसेनेचे दत्तात्रय कावरे, काँग्रेसचे शम्स खान, आणि एमआयएमचे शाहबाज सय्यद यांनी बंद पाकिटात आपल्या गटांच्या सदस्यांची नावे महापौरांच्या ताब्यात दिली. यानंतर महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी ती पाकिटं उघडत सदस्यांची अधिकृत घोषणा केली.

**स्थायी समिती सदस्य**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट):

गौरी बोरकर, सुरेश बनसोडे, हरप्रीत कौर गंभीर, संध्या पवार, मीना चोपडा, पौर्णिमा गव्हाळे, भाजप: सुभाष लोंढे, बाबासाहेब वाकळे, निखिल वारे, मनोज दुल्लम, मनोज कोतकर, सोनाबाई शिंदे, शिंदे सेना: नवनाथ कातोरे, सुनिता गेनप्पा, काँग्रेस: खान मीनाज जाफर, एमआयएम: शेख शहनाज खालिद

**महिला बालकल्याण समिती सदस्य**

राष्ट्रवादी काँग्रेस: दिपाली बारस्कर, सुनिता भिंगारदिवे, अनिता शेट्टीया, काजल भोसले, सुनिता कांबळे, अश्विनी लोंढे, भाजप: वंदना ताठे, शितल ढोणे, पुष्पा बोरुडे, आशाबाई कातोरे, रोशनी त्रिंबके, वर्षा सानप, शिंदे सेना: मंगल लोखंडे, रूपाली दातरंगे, काँग्रेस: खान मीनाज जाफर, एमआयएम: शेख शहनाज खालिद,

**स्वीकृत नगरसेवक**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून: विकी जगताप, रेवणनाथ पवार, बाबुशेठ नागरगोजे भाजपकडून: विशाल नाकाडे, रवींद्र बारस्कर शिंदे सेना: या पक्षाकडून आदेश सुरज जाधव यांच्या नावाची शिफारस करण्यात आली होती; मात्र, छाननीदरम्यान कागदपत्रे अपुरी असल्याने त्यांची निवड रद्द करण्यात आल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सभेत स्पष्ट केले.

तथापि, हा कोटा शिंदेसेनेचा असल्याने पुढील सभेत नव्या स्वीकृत सदस्याची निवड केली जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. या निवडीमुळे सर्व पक्षांचा प्रतिनिधित्व मनपा समित्यांमध्ये दिसून आला आहे.

### स्थायी समिती सदस्य

**राष्ट्रवादी**
(अजित पवार गट)
गौरी बोरकर
सुरेश बनसोडे
हरप्रीतकौर गंभीर
संध्या पवार
मीना चोपडा
पौर्णिमा गव्हाळे
**भाजप**
सुभाष लोंढे
बाबासाहेब वाकळे
निखिल वारे
मनोज दुल्लम
मनोज कोतकर
सोनाबाई शिंदे
**शिंदेसेना**
नवनाथ कातोरे
सुनिता गेनप्पा
**काँग्रेस**
खान मीनाज जाफर
**एमआयएम**
शेख शहनाज खालिद

**महिला व बालकल्याण समिती सदस्य**
**राष्ट्रवादी**
दिपाली बारस्कर
सुनिता भिंगारदिवे
अनिता शेट्टीया
काजल भोसले
सुनिता कांबळे
अश्विनी लोंढे
**भाजप**
वंदना ताठे
शितल ढोणे
पुष्पा बोरुडे
आशाबाई कातोरे
रोशनी त्रिंबके
वर्षा सानप
शिंदे सेना
मंगल लोखंडे
रूपाली दातरंगे
**काँग्रेस**
खान मीनाज जाफर
**एम आय एम**
शेख शेहनाज खालिद

# अहिल्यानगर महानगरपालिकेकडून १४ मार्चपर्यंत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये १०० टक्के सवलत

**। बिगर सिंचन पाणीपट्टी, वीज बिलांसह सुमारे २३० कोटींची देणी थकीत**
**। नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन थकीत कराचा भरणा करावा : आयुक्त यशवंत डांगे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सध्या चिंताजनक आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकबाकी २४० कोटींपेक्षा अधिक आहे. गाळेधारकांची थकबाकीही ३० कोटींपेक्षा अधिक आहे. महानगरपालिकेला सुमारे २३० कोटी १५ लाख रुपयांची देणी आहेत. यात पाटबंधारे विभागाला देय असलेल्या बिगर सिंचनाच्या पाणीपट्टीसह महावितरणला पाणी योजनांसाठी देय असलेल्या देणींचा



समावेश आहे. थकबाकीमुळे आर्थिक अडचणी निर्माण होऊन सेवा व सुविधांवर परिणाम होण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे महानगरपालिकेने १४ मार्चपर्यंत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देण्यात निर्णय घेतला आहे. नागरिकांनी या सवलतीचा लाभ घेऊन त्यांच्याकडे थकीत असलेल्या कराचा भरणा करावा व महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांनी महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीची माहिती देताना सांगितले की, जीएसटी अनुदान (११.७२ कोटी) आणि महसुली उत्पन्न (८ कोटी) असे मिळून दरमहा

■ पान ४ वर

# खून करून फरार झालेल्या आरोपीस २४ तासांत जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** बालानगर गावातील खून प्रकरणातील आरोपीस पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक करून गुन्ह्याचा उलगडा केला आहे.

दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास अहमद जाफर पठाण (रा. बालानगर) हा युसुफ जाफर पठाण यांच्या शेतातील इलेक्ट्रिक पोलजवळ बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्याच्या कपाळावर गंभीर दुखापत असून रक्तस्त्राव झाल्याचे दिसून आले. माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमीस शासकीय रुग्णालयात हलविले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

घटनास्थळ गावापासून दूर असल्याने नेमके काय घडले याची माहिती मिळणे कठीण होते. त्यामुळे पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान उभे राहिले. सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदाळे यांनी दोन पथके तयार करून गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान अहमद पठाण याच्यासोबत डोंणगाव तांडा येथील केशवराव छगन चव्हाण हा दिसल्याची माहिती मिळाली. त्यानुसार

■ पान ४ वर


## चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणारे
## जोशी महाराज (संत बाळूमामा प्रसन्न)

पत्रिका पाहून तर कोणीही भविष्य सांगू शकतो; परंतु चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणे, ही एक मोठी विद्या आहे. आपले भविष्य कोणत्या क्षेत्रामध्ये कसे आहे, हेसुद्धा सांगितले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही चेहरा पाहून भविष्य सांगतो. मंगलकार्य, व्यवसाय, शेती आणि वास्तुशास्त्राचे भाकित ते त्या-त्या घरातील कुटुंब प्रमुखाचा चेहरा पाहून करतो.

राजकीय क्षेत्रातील अनेकांबद्दल आम्ही सांगितलेले भविष्य खरे ठरले आहे. फिल्मलाईन, राजकीय, सामाजिक, मराठी, हिंदी अभिनेते, उद्योजक आणि बिझनेसमॅन, बिल्डर, रियल इस्टेट, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक दिग्गजांचे आम्ही भविष्य सांगितले आहे आणि ते खरेही ठरले आहे. घर, ऑफिस, हॉस्पिटल, कारखाना, हॉटेल यासारख्या जागा मग त्या मालकीच्या किंवा भाडेतत्त्वावर असल्या, तरी आम्ही भविष्य सांगतो. वास्तुदोष, पितृदोष, कालसर्पदोष, नागबळी दोष, नजरदोष इ. दोष टाळण्यासाठी आम्ही उपासनाही सांगतो. इतकेच नव्हे, तर स्त्री- पुरुष यांच्या सर्व समस्यांचे निवारण सांगतात. जमीन, नोकरी, व्यवसाय, संतती, लग्नविवाह आदींसह अन्य अडीअडचणींवर मार्ग सांगतो. कोणत्याही प्रकारच्या कठीण ते अतिकठीण अडचणींवर ते मार्ग सांगून मार्गदर्शन करतो. आतापर्यंत आपण सांगितलेले सर्व भविष्य खरे ठरले आहे, असा आमचा दावा आहे.




राजकीय व व्यावसायिक भविष्य वर्तविणारे
अनुभवसिद्ध ज्योतिषी जोशी महाराज

मु. पो. कडा कारखाना, ता. आष्टी, जि. बीड मो. 9075174343 / 9006239009

## दै. आकर्षण निवडक

### सुधीर दत्तात्रय फडके लिखित सर्वोपरि परात्परतत्व शिव पुस्तकाचे २८ रोजी प्रकाशन




अहिल्यानगर - शिवतत्व विवेचनावर आधारित असलेले ''सर्वोपरि परात्परतत्व शिव'' या पुस्तकाचे प्रकाशन येत्या शनिवारी (दि. २८) येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे सकाळी १०.३० वाजता होणार आहे, अशी माहिती या पुस्तकाचे लेखक सुधीर दत्तात्रय फडके यांनी दिली. शिवमहापुराण कथा आणि निरुपणकार तसेच श्री. गहनानंदजी महाराज, उपाध्यक्ष, रामकृष्ण मठ बेलूर, कोलकाता यांच्यामार्फत गुरुदीक्षा प्राप्त श्री. शेखरजी गाडगे उर्फ बाळ गाडगे (नागपूर) यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन संपन्न होत आहे. या कार्यक्रमास आध्यात्मिक त रननीसेच धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती असणार आहे, असे सांगण्यात आले.''सर्वोपरि परात्परतत्व शिव'' पुस्तकाचे लेखक सुधीर द. फडके हे जिल्हा परिषदेमध्ये विस्तार अधिकारी कृषी या पदावरून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांची आत्तापर्यंत कृषी विषयक पाच पुस्तके, लेहलडाख व नर्मदा परिक्रमा ही प्रवास वर्णने, गूढकथा, ज्योतिष, नामस्मरण चिंतन, भूकंप व त्याची कारणमिमांसा अशी २५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांनी विविध दैनिकांत कृषी विषयक लेखन केलेले आहे.श्री. सुधीर द. फडके यांच्या एका कृषी पुस्तकास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार प्राप्त झालेला आहे. तसेच विविध सामाजिक संस्थांचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

### नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक वारुळे यांचा विविध संस्थांकडून सत्कार

अहिल्यानगर- नगर तालुका पोलीस स्टेशन येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून गणेश वारुळे यांनी नुकताच पदभार स्वीकारला. यानिमित्त स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि नगर तालुका तालिम सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमात डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते वारुळे यांना फेटा बांधून शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पत्रकार संजय सावंत उपस्थित होते. पै. नाना डोंगरे यांनी पोलीस प्रशासन आणि समाज यांच्यात सुसंवाद व समन्वय आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, गाव व तालुक्याच्या विकासासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे अत्यंत गरजेचे आहे. पोलीस विभागाची जबाबदारी मोठी असून त्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करणे आवश्यक आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनीही आपल्या मनोगतात नागरिकांच्या सहकार्याने पारदर्शक व प्रभावी कामकाज करण्याचा मानस व्यक्त केला. गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी तत्परतेने सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे त्यांनी सांगितले. समाजात शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षितता राखण्यासाठी पोलीस दल अहोरात्र कार्यरत असते.

### कालकथित विश्वनाथ आहिरे

धामोरी- कोपरगाव तालुक्यातील धामोरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुयायी तथा बुद्धवासी तसेच विविध पदाधिकारी यांना शिक्षण प्राप्ती करून देणारे कलाकथित आदरणीय गुरुजी विश्वनाथ शिवराम आहिरे ( गुरुजी ) वय ८७ यांचे नुकतेच वयोवृद्ध काळाने नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातु नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या या दुःखद निधनाने धामोरी व धामोरी पारिसरात हळहळ व्यक्त केले जात आहे.



# नवीन पथदिव्यांमुळे महामार्ग उजळणार; सुरक्षित प्रवास आणि व्यापारीकरणाला चालना मिळणार – आमदार संग्राम जगताप

## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने पत्रकार चौक ते बोल्हेगाव फाटा या मार्गावरील पथदिवे कामाचा लोकार्पण सोहळा उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना अंतर्गत पत्रकार चौक ते बोल्हेगाव फाटा या मार्गावर १४० नवीन पथदिवे बसविण्यात आले असून, या कामाचा लोकार्पण सोहळा आमदार संग्राम जगताप यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक अविनाश घुले, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, अजिंक्य बोरकर, ऋग्वेद गंधे, बाळासाहेब पवार, रामदास आंधळे, डॉ. सागर बोरुडे, महेश लोंढे, दत्ता गाडळकर, अजय ढोणे, महेश तवले, नगरसेविका पुष्पाताई बोरुडे, वर्षा सानप, सोनाबाई शिंदे, सुजाता पडोळे, दगडू मामा पवार, शहर अभियंता मनोज पारखे, गजेंद्र भांडवलकर, सचिन जगताप, सतीश शिंदे, सुधीर लांडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहराचा विकास झपाट्याने होत आहे. आता शहर दोन भागांत विभागले गेले असून उपनगरांमध्ये नागरिक वास्तव्यासाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. पत्रकार चौक, माऊली चौक, प्रेमदान चौक, सावेडी नाका आणि बोल्हेगाव फाटा या मार्गावर मुंबईच्या धरतीवर नवीन पोल आणि दिवे बसविण्यात आले आहेत.



त्यामुळे हा संपूर्ण महामार्ग उजळणार असून नागरिकांना सुरक्षित प्रवासाची सोय उपलब्ध होईल. ते पुढे म्हणाले, या महामार्गाच्या उजळणीमुळे व्यापारीकरणालाही चालना मिळेल आणि शहराच्या वैभवात भर पडेल. नागरिक आणि प्रशासन यांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच अहिल्यानगर अधिक आधुनिक आणि सुंदर बनवू शकतो. महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, या नागरी दलितेतर वस्ती सुधार योजनेतून एकूण १४० नवीन पथदिवे बसविण्यात आले आहेत.

या पोलवर कोणत्याही प्रकारचे पोस्टर, फ्लेक्स किंवा डिजिटल केबल लावू नयेत. असे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल केला जाईल. ते पुढे म्हणाले की, महापालिकेचे उद्दिष्ट फक्त विकास नव्हे, तर स्वच्छ, सुंदर आणि हरित शहर निर्माण करणे आहे. नागरिकांनी सहकार्य केल्यास हे शहर राज्यातील आदर्श शहर बनेल. महापौर ज्योतीताई गाडे यांनी या प्रसंगी सांगितले की, महापालिकेच्या माध्यमातून शहरातील प्रत्येक वॉर्डात पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत.

नागरिकांच्या सोयीसाठी अनेक विकासकामे मंजूर करण्यात आली असून, नगरकरांच्या सहकार्याने ती वेळेत पूर्ण केली जातील. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले, महापालिकेचे काम हे लोकसहभागाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. नगरकरांनी विकासकामांसाठी पुढाकार घेतला पाहिजे. नगरसेवक, अधिकारी आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच शहराचा कायापालट शक्य आहे.कार्यक्रमाचा समारोप नागरिकांच्या जल्लोषात झाला. उपस्थित मान्यवरांनी नवीन पथदिव्यांची पाहणी करून कामाच्या गुणवत्तेचे कौतुक केले. नव्या प्रकाशात न्हालेला हा महामार्ग आता अहिल्यानगरच्या आधुनिकतेचा प्रतीक बनला आहे.

# राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंतीनिमित्त मरणोत्तर देहदानाचा संकल्प

## । जिल्हा रुग्णालयात कुटुंबीयांसह भरुन दिला संकल्प अर्ज
## । जीवन संपले तरी शरीराने इतरांना उपयोगी पडावे – अशोक शिंदे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक शिंदे यांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त मरणोत्तर देहदानाचा संकल्प करून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला. आपल्या कुटुंबीयांसह जिल्हा रुग्णालयात उपस्थित राहून त्यांनी देहदानाचा संकल्प अर्ज अधिकृतरित्या भरून दिला.

हा उपक्रम जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली, नेत्र विभागाचे समुपदेशक सतीश आहिरे यांच्या पुढाकाराने तसेच महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त सामाजिक कार्यकर्ते सुनील सकट यांच्या माध्यमातून राबविण्यात आला. यावेळी जिल्हा रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रविण बोठे यांच्या हस्ते शिंदे यांना देहदान संकल्प प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास कर्मचारी व्यवस्थापक प्रमोद बोराटे, उषा शिंदे, वैष्णवी शिंदे, विक्रम वैरागर, आराध्या वैरागर, सार्थक शिंदे यांच्यासह रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी व शिंदे कुटुंबीय उपस्थित होते.



अशोक शिंदे म्हणाले की, धर्मातील रूढी-परंपरांना फाटा देत त्यांनी देहदानाचा निर्णय घेतला आहे. ''मृत्यूनंतर देह जळतो किंवा पुरला जातो; परंतु त्याच देहातून एखाद्याला नवी दृष्टी, नवा श्वास आणि नवजीवन मिळत असेल, तर त्याहून मोठी समाजसेवा कोणती?'' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

अवयवदान व देहदानामुळे मनुष्य मृत्यूनंतरही जिवंत राहतो, असे सांगत त्यांनी मृत्यूनंतर कोणतेही धार्मिक विधी न करता पत्नीनेही विधवांच्या परंपरेत न अडकता सुवासिनीसारखे आयुष्य जगावे, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

सुनील सकट म्हणाले की, अशोक शिंदे यांचा हा निर्णय केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. देहदान, नेत्रदान व अवयवदान याविषयी समाजात अजूनही मर्यादित प्रमाणात चर्चा होते. अशा कृतींमुळे लोकांचा दृष्टीकोन सकारात्मक बदलतो. शासनाच्या विविध मोहिमा यशस्वी होण्यासाठी समाजातील जागरूक नागरिकांचा सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# नगरच्या दीपाली बिहाणी यांचा सोनी टीव्हीवरील 'मास्टर शेफ'मध्ये सहभाग

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील अनेकांनी आजपर्यंतच्या विविध क्षेत्रात मोठ-मोठ्या यशाला गवसणी घातली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव शहराला मिळाले आणि अनेक महिलांना एक नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली. अहिल्यादेवींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून येथील अहिल्येच्या लेकी आपले कौशल्य, बुद्धिमत्ता आणि धैर्यावर आधारित विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. अशीच एक अहिल्येची लेक म्हणजे पाकशास्त्रकला निपूण दीपाली बिहाणी.

भारतात आज महिला मोठ्या प्रमाणावर उद्योग, व्यवसाय अथवा नोकरीमधून स्वतःच्या पायावर उभ्या आहेत, तिथे अनेक महिला गृहिणी म्हणून संसाराची जबाबदारी सांभाळत आहेत. गृहिणी या शब्दाचे अनेकजण अर्थ लावतात की चूल आणि मूल. परंतु स्वयंपाक करणे ही देखील कला असून गृहिणी म्हणून कार्यरत असताना देखील याच पाककलेच्या जोरावर किती उत्तुंग यश प्राप्त करू शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे दीपाली बिहाणी.

प्रसिद्ध दूरचित्रवहिनी सोनी टीव्हीवरील 'मास्टर शेफ इंडिया' रिॲलिटी शो असणार्या या स्पर्धे त अहिल्यानगरच्या दीपाली बिहाणी यांनी स्थान मिळवत नगरचे नाव देशभर पोहोचवले.

या स्पर्धेत स्पर्धकांनी विविध खाद्यपदार्थ बनवायचे होते. त्याचे चित्रीकरण मायानगरी मुंबईत मालाड येथील एका स्टुडिओमध्ये करण्यात आले. सुगरणींनी नवनवीन खाद्यपदार्थ बनवून पारंपरिक आणि प्रादेशिक भारतीय पदार्थांचा मिलाप साधत प्रेक्षकांची आणि परीक्षकांची मने जिंकली.




सोनी टीव्हीवरील 'मास्टर शेफ इंडिया' हा एक भारतीय कुकींग शो महाराष्ट्रातील सुगरणींसाठी आपले पाककौशल्य सिद्ध करण्याचे एक व्यासपीठ आहे. या रिॲलिटी शोमध्ये सहभागी होण्यासाठी ७ हजार स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यामुळे स्पर्धा कठीण होती. स्पर्धेच्या एकूण सात बाद फेर्या होऊन आठव्या फेरीत मास्टर शेफसाठी बारा स्पर्धक निवडले गेले. दीपाली बिहाणी यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करत बारा स्पर्धकामध्ये स्थान मिळवले. यासाठी वेगवेगळ्या पदार्थांचे सादरीकरण आणि चव पारखली गेली. या स्पर्धेसाठी रणवीर ब्रा, कुणाल कपूर, विकास खन्ना यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.
दीपाली बिहाणी या जळगावमधील अडावद येथील प्रसिद्ध उद्योजक ओमप्रकाश दहाड यांच्या कन्या आहेत. मूळचे वांबोरी आणि सध्या नगरमध्ये स्थायिक असलेले डॉ. सुरेश बिहाणी व तारा बिहाणी यांच्या त्या स्नुषा आहेत. सागर सर्जिकलचे अभिजीत बिहाणी यांच्या पत्नी दीपाली बिहाणी यांनी मास्टर शेफ स्पर्धेत भाग घेण्याआधी 'बेटर किचन्स ' द्वारे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील स्वयंपाक स्पर्धेत 'किचन स्टार ऑफ इंडिया' हा किताबही मिळवला आहे. लोकशाही मराठी न्यूज चॅनल आणि मंगलम्‌ वेडिंग डेस्टीनेशन क्लब आयोजित 'किचन क्वीन' स्पर्धेतही त्यांनी सहभाग घेतला होता. 'मास्टर शेफ दीपालीज किचन' या नावाने सोशल मीडियावर त्या नवनवीन पाककृती आणि स्वयंपाकाची कौशल्ये शेअर करत असतात. विविध दूरचित्रवाहिन्यांवर त्यांनी पाककृती सादर केल्या आहेत. अनेक मासिकांमध्ये त्यांचे पदार्थ प्रसिद्ध झाले आहेत. पारंपरिक आणि प्रादेशिक पदार्थांचा मेळ घालत घरगुती पदार्थांचे जागतिक दर्जाचे आकर्षक सादरीकरण करत त्या आता 'मास्टर शेफ ऑफ इंडिया' या स्पर्धेत आपले पाककौशल्य सिद्ध केले आहे.

पारनेर विकास योजनेला शासनमान्यता;

# आमदार काशिनाथ दाते सरांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पारनेर शहराच्या नियोजित आणि शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी ''विकास योजना पारनेर'' ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३१ (१) अन्वये अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. या सूचनेनंतर विकास आराखड्याची अंमलबजावणी कायदेशीरदृष्ट्या लागू होणार असून शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचे आ. दाते यांनी सांगितले. या विकास योजनेला शासनस्तरावर मान्यता मिळवून देण्यासाठी आपण सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. विविध स्तरांवर बैठका, संबंधित विभागांशी समन्वय आणि आवश्यक त्या सूचना यामुळेच ही प्रक्रिया मार्गी लागली आहे.



दि. ४ ते ९ सप्टेंबर २०२५ दरम्यान संबंधित फाईल मंत्रालयात विविध स्तरांवर वेगाने पुढे सरकली. ४ सप्टेंबर रोजी सहसचिव सुलेखा वैजापुरकर यांच्याकडे फाईल पोहोचली. ५ सप्टेंबर रोजी अपर मुख्य सचिव असीम गुप्ता यांनी तिची पाहणी केली. ८ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे फाईल सादर झाली आणि त्याच दिवशी उपमुख्यमंत्र्यांचे सहसचिव व्यंकटेश भट यांची भेट आ. दाते यांनी घेतली.

९ सप्टेंबर रोजी अवर सचिव सुधीर शास्त्री यांच्याकडे पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या प्रत्येक टप्प्यावर आमदार दाते सर स्वतः मंत्रालयात उपस्थित राहून पाठपुरावा करत होते. प्रशासकीय स्तरावरील आवश्यक पूर्तता, स्पष्टीकरणे आणि समन्वय वेळेत पूर्ण झाल्यामुळे मंजुरीची प्रक्रिया गतिमान झाली. दरम्यान, दिवंगत नेते अजितदादा पवार यांनीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या योजनेच्या मंजुरीसाठी विशेष विनंती केली होती. दोन महिन्यांत मंजुरी देण्याचा शब्द शिंदे साहेबांनी दिला आणि तो पाळत विकास योजनेला शासनमान्यता मिळाली.

मंजूर विकास आराखड्यातील आरक्षणे, रस्ते, सार्वजनिक सुविधा, सामाजिक व पायाभूत सुविधा यांची तरतूद आता नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून शहराचा संतुलित आणि सुबक विकास साधता येणार आहे.

पारनेरच्या विकासाचा दीर्घकालीन रोडमॅप निश्चित करणारी ही योजना प्रत्यक्षात येणे हे शहरासाठी ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. आमदार दाते सरांच्या विशेष प्रयत्नांमुळे पारनेर शहराच्या विकासाला कायदेशीर चौकट प्राप्त झाली असून आगामी काळात पायाभूत सुविधा, रस्ते, सार्वजनिक सोयी-सुविधा आणि नियोजित विस्ताराला गती मिळणार आहे. पारनेरच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आमदार दाते सरांचा हा पुढाकार निर्णायक ठरणार असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे.

**विकास आराखड्याला मंजुरी मिळाल्याने पारनेरच्या भविष्यासाठी भक्कम पाया रचला गेला आहे. आमदार दाते सरांच्या प्रयत्नांमुळे शहराच्या वाढत्या गरजांना दिशा देणारी कायदेशीर चौकट तयार झाली. आता रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि सामाजिक प्रकल्प नियोजनबद्ध पद्धतीने राबविता येतील. हा निर्णय पारनेरच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**

**युवराज पठारे,**
**नगरसेवक पारनेर**

**पारनेर विकास योजनेला शासनमान्यता मिळणे हा शहरासाठी ऐतिहासिक क्षण आहे. आमदार काशिनाथ दाते सरांनी सातत्याने पाठपुरावा करून ही प्रक्रिया पूर्णत्वास नेली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. या आराखड्यामुळे शहराचा नियोजित विकास होऊन पायाभूत सुविधांना नवी गती मिळेल. नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देणारा हा निर्णय ठरेल.**

**अशोक चेडे,**
**नगरसेवक पारनेर**

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### गवांदे क्लासेसचा झळाळता विक्रम - गणितात विद्यार्थ्यांची अभूतपूर्व कामगिरी!



अहिल्यानगर- नुकत्याच जाहीर झालेल्या () २०२६ परीक्षेत गवांदे मॅथ्स क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी गणित विषयात चमकदार कामगिरी करत, निकालाचा उच्चांक प्रस्थापित केला आहे. पहिल्याच प्रयत्नात विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून क्लासेसचे नाव राज्यभर झळकवले आहे. सदर परीक्षेत श्रुती भळगट (९७.०९), शुभम म्हस्के (९७.०७), प्रणव घुले (९५.४३), कार्तिक खडके (९४.८७), ऋतुराज काकडे (९४.५३), यश पावडे (९४.३२), वेदांत कोरडे (९०.९२), हरिष वाघ (९०.०१), कार्तिक कोल्हे (८८.७४) या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे. त्याचबरोबर अनुराधा कसाब, ओंकार तापकीर, श्रावणी सानप, मयूर पानमंद, आदित्य तुपे, कृष्णा भोर, कृष्णाली कासार आणि वैष्णवी कोरडे या विद्यार्थ्यांनीही प्रभावी कामगिरी केली आहे. गवांदे क्लासेसचे जवळपास ३७ विद्यार्थी पहिल्याच प्रयत्नात () म्हणजेच प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. या यशामुळे गवांदे क्लासेसचे विद्यार्थी आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संचालक प्रा. प्रभाकर गवांदे, सौ. छायाताई गवांदे, व्यवस्थापक युवराज महांडुळे, व्यवस्थापिका मोनाली पवार, मेघा भास्कर, किशोर गिते यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रा. गवांदे यांनी सांगितले की, ‘‘विद्यार्थ्यांचे हे यश सातत्यपूर्ण मेहनत, वेळेचे योग्य नियोजन आणि नियमित सराव यामुळे शक्य झाले. गणित हा विषय फक्त अभ्यासाचा नाही तर विचारशक्ती वाढविण्याचं साधन आहे. सध्या ११वी विज्ञान मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १२वी -, तसेच क्रॅश कोर्स बॅचेसची प्रवेश प्रक्रिया गवांदे क्लासेसमध्ये सुरू असून, विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

### अरहान अजीम खान याचा रमजानचा पहिला रोजा

अहिल्यानगर- येथील अरहान अजीम



खान याने रमजान चा पहिला रोजा (उपवास) केला. वयाच्या सहाव्या वर्षी त्याने रमजानच्या पवित्र महिन्यात अन्न, पाणी विना उपास केला आहे.पहाटे त्याने सहेरी करून भक्तीभावाने नमाज अदा केली व संध्याकाळी रोजा इफ्तारीने सोडला तब्बल तेरा तासाहून अधिक काळ त्याने निर्जली रोजा ठेवला होता. तो अल नूर इंग्लिश स्कूल मध्ये शिक्षण घेत आहे. त्याने केलेल्या रोजाबद्दल नातेवाईक व परिसरातील नागरिकांनी त्याचे कौतुक करून अभिनंदन केले.

### रमेश बाळासाहेब राऊत यांचे निधन

अहिल्यानगर- केडगाव (शाहूनगर)



येथील रहिवासी श्री. रमेश बाळासाहेब राऊत (वय ५५) यांचे दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.मूळ गाव रुई छत्तीशी येथील असलेले श्री. राऊत हे गेल्या सुमारे तीस वर्षांपासून व्यवसायानिमित्त केडगाव येथे वास्तव्यास होते. परिसरात त्यांचा उत्तम जनसंपर्क होता. धार्मिक व सामाजिक कार्यात ते नेहमी सक्रिय सहभाग घेत असत.त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# मुलांचे कलागुण समजण्यासाठी व्यासपीठ मिळणे महत्वाचे - महापौर ज्योतीताई गाडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शालेय जीवनात मुलांमध्ये असणारे कलागुण समजण्यासाठी स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ मिळणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले. महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशन (मेस्टा) च्या माध्यमातून आंतरशालेय नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण सौ. गाडे यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी नगरसेवक संपत बारस्कर, मीराज स्कूलच्या सौ. मीरा बारस्कर, राऊ इंग्लिश मिडीयम स्कूल च्या सौ दिपाली झांजड, लिटील फ्लावर स्कूलचे गोरक्षनाथ नरवडे, माऊली इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सौ. सविता वाव्हळ, ब्लू डायमंड स्कूलचे सुजित डोंगरे, साई इंग्लिश मिडीयम स्कूलचे आदर्श ढोरजकर, डॉ शरद कोलते




इंग्लिश मिडीयम स्कूल चे प्रा विजय शिंदे, पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपत बारस्कर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. वैष्णवी उदमले व सृष्टी मगर यांनी गणेश वंदना सादर केली. एकूण सात शाळातील ११० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. गाडे पुढे म्हणाल्या कि विद्यार्थी जीवनात अशा स्पर्धा गरजेच्या आहेत. यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढीस लागून ते जीवनात यशस्वी होण्यासाठी मदत होईल. बारस्कर यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. स्पर्धत माऊली इंग्लिश मिडीयम स्कूलचा प्रथम तर ब्लू डायमंड अकॅडेमीचा द्वितीय क्रमांक आला. मीराज स्कूल ला उत्तेजनार्थ तृतीय बक्षीस देण्यात आले. विजेत्यांना महापौर सौ. गाडे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

या नंतर विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी जादुगार धनजंय वडीतके यांचे जादूचे प्रयोग ठेवण्यात आले होते. नृत्य परीक्षक म्हणून सिद्धार्थ मेहेत्रे यांनी काम पाहिले. राबवण्याच्या मानस यावेळी व्यक्त करण्यात आला. संघटनेच्या वतीने वर्षभर विविध उपक्रम प्रा विजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले तर सुजित डोंगरे यांनी आभार व्यक्त केले.

## चांगतपुरीजवळ भीषण दुर्घटना : कालव्यात पडलेल्या कारमधील तिघांचे मृतदेह सापडले



मुकीद शेख



निलोफर शेख



रावसाहेब खडेकर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील चांगतपुरी गावाजवळ उजव्या कालव्यात स्विफ्ट डिझायर कार कोसळून नवरा-बायकोसह त्यांना वाचवण्यासाठी गेलेल्या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. बुधवारी सायंकाळी तिघांचेही मृतदेह वेगवेगळ्या ठिकाणी आढळून आले.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. २३ सोमवारी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास चांगतपुरीजवळील उजव्या कालव्या परिसरात स्विफ्ट डिझायर गाडी रिव्हर्स घेत असताना अचानक कालव्यात कोसळली. गाडीत पती-पत्नी होते. त्यांना वाचवण्यासाठी स्थानिक युवकानेही कालव्यात उडी घेतली. मात्र तिघेही पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले.

बुधवारी शोधमोहीम राबविल्यानंतर पुढीलप्रमाणे मृतदेह सापडले १. निलोफर मुकीद शेख (वय ३०, रा. कोरडगाव) यांचा मृतदेह गुळज शिवारातील पाटाच्या पाण्यात आढळला. २. मुकीद अहमद शेख (वय ३५, रा. कोरडगाव) यांचा मृतदेह बोरगाव येथील कालव्यात सापडला. ३. रावसाहेब गणपत खडेकर (रा. चांगतपुरी) यांचा मृतदेह हदगाव शिवारातील काशी नदी कालव्यात आढळून आला. या घटनेमुळे चांगतपुरी परिसरात शोककळा पसरली असून गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

## पोस्को गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्याची पिडीतीच्या कुटुंबीयांची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून, या प्रकरणात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल होऊनही संबंधित आरोपी अद्याप मोकाट फिरत असल्याचा आरोप पीडित मुलीने केला आहे. आरोपी सतत घरी येऊन फिर्याद मागे घेण्यासाठी धमक्या देत असल्याने कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणी रोहण अशोक बोरुडे (रा. रामडोह, ता. नेवासा) याच्याविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात दि. २७ जानेवारी २०२६ रोजी पोस्को कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अत्याचारानंतर पीडित मुलीवर शेवगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. उपचारादरम्यानच तिने पोलिसांकडे तक्रार दाखल केली.



मात्र, गुन्हा दाखल होऊनही अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नसल्याने पीडित मुलगी व तिच्या कुटुंबीयांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आरोपीचा स्वभाव गुन्हेगारी स्वरूपाचा असून तो मोकाट असल्यामुळे आमच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, असे मुलीने आपल्या निवेदनात म्हटले आहे. फिर्याद मागे घेण्याच्या दबावासाठी आरोपी दोन ते तीन वेळा घरी येऊन शिवीगाळ व दमदाटी करत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

# अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेत ‘नृत्यझंकार’चे उज्वल यश

**कथक नृत्यात २७ विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य मिळवत अहिल्यानगर केंद्रात मानाचे स्थान पटकावले**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या कथक नृत्याच्या परीक्षांमध्ये अहिल्यानगर येथील ‘नृत्यझंकार’ नृत्यवर्गाने घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेत सहभागी झालेल्या सर्वच विद्यार्थिनींनी प्रथम श्रेणी प्राप्त करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली. विशेष म्हणजे २७ विद्यार्थिनींनी विशेष योग्यता मिळवत सर्वच परीक्षांमध्ये अहिल्यानगर केंद्रात मानाचे स्थान पटकावले आहे.



प्रारंभिक प्रथम वर्ष परीक्षेत कु. स्वरा जोशी, भार्गवी पुंड आणि साईशा बेल्हेकर यांनी संयुक्तपणे प्रथम क्रमांक मिळवला. विश्वजा आमले व वीरा धिरडे यांनी द्वितीय क्रमांक, तर वृषाली पाटील व सई बिडवई यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

प्रवेशिका (प्रथम-द्वितीय वर्ष) परीक्षेत वैष्णवी खराडे व अनुश्री भागवत यांनी प्रथम क्रमांक मिळवला. सुखदा कांबळे हिने द्वितीय क्रमांक, तर पर्णवी तागड हिने तृतीय क्रमांक मिळवून यशाची नोंद केली.

प्रवेशिका पूर्ण (तृतीय वर्ष) परीक्षेत सांस्कृतिक कारले हिने प्रथम क्रमांक मिळवला. गरिमा भालसिंग व स्वामिनी शिंदे यांनी द्वितीय क्रमांक, तर मैथिली वैद्य व गौरी माने यांनी तृतीय क्रमांक मिळवून नृत्यकौशल्य सिद्ध केले.

मध्यमा (प्रथम-चौथे वर्ष) परीक्षेत साक्षी बारहाते हिने प्रथम क्रमांक, हर्षा अत्रे हिने द्वितीय क्रमांक, तर सई बिडवे हिने तृतीय क्रमांक मिळवला.

विशारद (प्रथम) परीक्षेत अनुष्का बेदरे हिने प्रथम क्रमांक पटकावून ‘नृत्यझंकार’च्या यशात भर घातली.

या सर्व विद्यार्थिनींना नृत्यझंकारच्या संचालिका प्रिया ओगले-जोशी यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, कठोर सराव व शास्त्रीय शिस्त लाभली. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थिनींनी कथक नृत्यातील तंत्र, तालबद्धता आणि अभिव्यक्ती प्रभावीपणे सादर करत उत्कृष्ट निकाल मिळवला, असे पालक व रसिकांनी गौरवोद्गार काढले. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यार्थिनींचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

**आनंद ग्लोबल फाउंडेशन, आनंद ग्लोबल फाउंडेशन संचालित**

## आनंदऋषीजी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल फायर ॲण्ड इंडस्ट्रीयल सेफ्टी कोर्सचा १०० टक्के निकाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई अंतर्गत घेण्यात आलेल्या हिवाळी परीक्षा २०२५२६ मध्ये आनंदऋषीजी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल फायर अँड इंडस्ट्रियल सेफ्टी, अहिल्यानगर या संस्थेने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत १०० टक्के निकालाची उज्ज्वल कामगिरी नोंदविली आहे.

एडीएमएलटी या अभ्यासक्रमात कानवडे शिवानी व डोंगरे अनिकेत यांनी प्रथम क्रमांक पटकावला. बोरसे पूजा व महाजन गणेश यांनी द्वितीय क्रमांक मिळविला, तर तुपे प्रकाश यांनी तृतीय क्रमांक संपादन केला. एडीआयएस या अभ्यासक्रमात अभिषेक कुमार सिंग व सलमान खान यांनी प्रथम क्रमांक मिळविला. नवाज शरीफ व दांदले श्रीकृष्ण यांनी द्वितीय क्रमांक,



कानवडे शिवानी



अभिजीत कुमार



देशमुख हरिष

तर मोहम्मद सलीम व मोहम्मद वाशिम यांनी तृतीय क्रमांक मिळविला. डिप्लोमा इन फायर इंजिनीअरिंग या अभ्यासक्रमात देशमुख हरिष यांनी प्रथम क्रमांक, चेंगेडीया अक्षय व पुनम यांनी द्वितीय क्रमांक, तर सोनवणे पंकज व कानगुडे सोमनाथ यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल संस्थेचे संचालक प्रा. हिरालाल लुनावत, सचिव अमृता जैन, कोषाध्यक्ष मनोज लुणावत तसेच प्रा. सुंबे , प्रा. सुरकुटला , मनीषा बोरा , जयेश बोथरा व मयुरी तिवारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२६२७ साठी पीजी डीएमएलटी, एडीआयएस आणि डिप्लोमा इन फायर सर्व्हिस इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून उत्कृष्ट गुणवत्ता व सातत्यपूर्ण निकालाची परंपरा असलेल्या आनंदऋषीजी इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ७२७६८१३१९९, ९१४५१५५७५५, ९१४६७५५९५५, ९११२७५५९५५ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रा. हिरालाल लुनावत यांनी केले आहे.

# चिखला गावातील संजीवनी वाघ प्रकरणी आरोपींवर तात्काळ कारवाईची मागणी

**। जामखेडमधील अतिक्रमण काढून व रस्त्याच्या कामाची चौकशी करा । अखंड मराठा समाजाचे निवेदन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील चिखला गावात २० फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी पाच ते सात वाजण्याच्या सुमारास घडलेली घटना संपूर्ण महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासणारी असल्याचा तीव्र निषेध अखंड मराठा समाजाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. शिवस्मारक हटविण्याच्या उद्देशाने काही समाजकंटकांनी मराठा समाजातील बांधव व भगिनींवर दगडफेक व मारहाण केल्याची घटना अत्यंत संतापजनक असून या प्रकरणात संजीवनी वाघ यांच्यासह अनेक महिलांवर अमानुष अत्याचार झाल्याची माहिती समोर आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महिलांवर हात उचलणे हा केवळ कायद्याचा भंग नसून मानवतेवर घाव असल्याचे सांगत, स्त्री सन्मान व न्यायाची शिकवण देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा अवमान करणारी ही कृती असल्याचे अखंड मराठा समाजाने म्हटले आहे. या घटनेची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याच निवेदनात जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी संदर्भातील प्रश्नांवरही लक्ष वेधण्यात आले. जामखेड या शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी हा वाहतूक व व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून परिसरातील तालुके व मराठवाडा विभागाशी संपर्क साधणारा प्रमुख मार्ग आहे.

मात्र जामखेड-सौताडा या रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी १८ महिन्यांचा कालावधी निश्चित असतानाही गेली तीन ते चार वर्षे हे काम प्रलंबित असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून, जामखेड शहर वगळता

## फिजिक्सवालाच्या गुणवंत विद्यार्थ्यांची सावेडीत जल्लोषमय मिरवणूक

**जेईई मेन्स २०२६ मध्ये मनीष मुटकुळे जिल्ह्यात प्रथम**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फिजिक्सवालाच्या अहिल्यानगर केंद्रातील विद्यार्थ्यांनी जेईई (संयुक्त प्रवेश परीक्षा) मेन्स २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्तेची छाप उमटवली आहे. पहिल्याच वर्षाच्या ९५ पेक्षा अधिक पर्सेंटाइल मिळवलेल्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांसह सावेडी उपनगरात भव्य मिरवणूक काढून जल्लोष साजरा करण्यात आला.



मनीष सुनील मुटकुळे याने ९९.५६ पर्सेंटाइल मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. संस्थेच्या गुणवत्ता यादीतही त्याने राज्यात अव्वल स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे मनीषने भौतिकशास्त्र विषयात ९९.१८ तर गणित विषयात ९९.७८ पर्सेंटाइल मिळवत विषयवारही उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. नियमित सराव, वेळेचे अचूक नियोजन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन हे यशाचे प्रमुख घटक असल्याचे त्याने सांगितले.

याचबरोबर जगताप आदित्य संदीप (९५.८७ पर्सेंटाइल) आणि सोनवणे समर्थ वासुदेव (९५.४६ पर्सेंटाइल) यांनीही पहिल्याच प्रयत्नात उल्लेखनीय यश मिळवत केंद्राचा लौकिक वाढवला. या तिघांच्या कामगिरीमुळे स्पर्धा परीक्षांसाठी संस्थेने राबवलेल्या शिस्तबद्ध नियोजनाची प्रचिती आली आहे.

या निकालाचा सावेडी परिसरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. प्रोफेसर कॉलनी चौक येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांनी अभिवादन केले व एकच जयघोष केला. त्यानंतर प्रोफेसर चौकातून भिस्तबाग चौक, एकविरा चौक मार्गे गुलमोहर रोड येथील केंद्रापर्यंत रॅली काढण्यात आली. गुलालाची उधळण, ढोल-ताशांचा गजर आणि युवक-युवतींचा उत्साही सहभाग यामुळे परिसर दणाणून गेला. या मिरवणुकीत विद्यार्थ्यांसह पालक, मार्गदर्शक शिक्षक आणि स्थानिक नागरिकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ढवळगाव येथे २८ फेब्रुवारीला विराट हिंदू संमेलन




दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**बेलवंडी–** हिंदू समाजात एकता व संघटन वाढवण्यासाठी तसेच जात, पंथ व भाषा भेद विसरून सर्वांनी एकत्र येण्याच्या उद्देशाने श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथे 'विराट हिंदू संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. हे संमेलन शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे.

हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती आणि मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करून राष्ट्रीयत्व व देशभक्तीची भावना जागृत करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. श्रीगोंदा तालुक्यातील पहिले भव्य हिंदू संमेलन म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिले जात आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण ढवळगाव येथील गुरुकृपा मंगल कार्यालय असे असून तालुक्यातील विविध गावांमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. ढवळगाव मंडळ तसेच देवदैठण, येवती, आरणगाव दुमाला, कोंडेगव्हाण, रायगव्हाण, माठ, हिंगणी दुमाला, राजापूर, मेंगलवाडी आणि दाणेवाडी येथील कार्यकर्ते व ग्रामस्थ या संमेलनाच्या आयोजनात सहभागी झाले आहेत. हिंदू समाजातील प्रत्येक बांधव व भगिनींनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वयंसेवकांनी पुढाकार घ्यावा, अशी विनंतीही करण्यात आली आहे. या संमेलनाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या प्रतिसादाची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## सिध्देश्वर विद्यालयाच्या अवतार वाचन उपक्रमासाठी प्रकाश पठारे यांचकडून पुस्तके भेट



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**बेलवंडी–** आजचा शालेय विद्यार्थी वाचन संस्कृती पासुन दुरावत चालला आहे ही बाब लक्षात घेऊन श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील सिद्धेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सामाजिक बांधिलकी जपणारे व उपक्रमशील शिक्षक म्हणून ज्यांची ओळख आहे असे प्रकाश पठारे यांनी आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांची अवतार वाचनाची आवड वाढावी म्हणून तब्बल पाच हजार रुपये किमतीची शेकडो पुस्तके विद्यालयाच्या ग्रंथालयांना भेट म्हणून दिली. यामुळे विद्यालयात सुरु असणाऱ्या अवांतर वाचन उपक्रमाला चालना मिळणार आहे.

या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक व इतर शिक्षक वृंद उपस्थित होते. सरांच्या या सामाजिक बांधिलकीचे आमदार संग्राम जगताप , मांडवगण गटांचे लोकनेते,माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप,संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अॅड.डी.डी.घोरपडे ,मांडवगण ग्रामपंचायतीचे आजी माजी पदाधिकारी , तसेच शैक्षणिक क्षेत्रातील जाणकारांनी विशेष अभिनंदन केले.

# पद्मशाली समाजाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करणार - डॉ. सूर्यप्रकाश कोठे

### पद्मशालीसमाज अहिल्यानगर च्या वतीने पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष कोठे यांचा सन्मान

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली समाजाचे अध्यक्षपदी डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांची निवड झाल्याने सोलापूरहुन अहिल्यानगर येथे भेटीसाठी आले असता अहिल्यानगर पद्मशाली पंचकमिटी समाजाच्या वतीने अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा व पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली समाजाचे मा.उपाध्यक्ष दत्तात्रय रासकोंडा यांनी त्यांचा सन्मान केला या वेळी त्यांच्या सोबत पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष मा.नगरसेवक शशिकांत कैची, खजिनदार श्रीनिवास चिलका, उद्योजक यलाप्पा गड्डम, नरसिंग कोडम, संगमनेर येथील मा. नगरसेवक सिद्राम दिड्डी व पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली समाजाचे मा.उपाध्यक्ष दत्तात्रय रासकोंडा येथील , पंचकमिटी चे पुरषोत्तम बुरा, अॅड. राजू गाली, विनोद बोगा, गणेश चेन्नुर, पुरषोत्तम सब्बन, श्रीनिवास रासकोंडा, प्रविण दिड्डी आदी उपस्थित होते.



या वेळी सत्कारास उत्तर देतांना डॉ. कोठे म्हणाले अहिल्यानगर येथे पद्मशाली समाज मोठा आहे अनेक क्षेत्रात विखूरलेला आहे, समाजाची एकी नसल्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास खुंटलेला आहे यासाठी माझ्या पदाचा उपयोग अहिल्यानगर येथील पद्मशाली समाजाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करणार असे डॉ. कोठे म्हणाले.

या वेळी मा. नगरसेवक कैची म्हणाले आम्ही सोलापूरहुन अहिल्या नगर येथे सोलापूर पद्मशाली समाजाची माहिती देण्यासाठी आलो असून सोलापूर येथे पद्मशाली समाजाची एकी असल्यामुळेच समाजाचा आमदार, महापौर व १८ नगरसेवक निवडून आलेले आहेत या प्रमाणेच नगर येथेही एकी होणे गरजेचे असून आम्ही आ. कोठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंचकमिटी पद्मशाली समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा यांनी करताना म्हणाले की, नगर येथे समाजाची एकी नसल्यामुळेच समाजाला सर्वच स्तरातून नुकसान होत आहे. परंतु आम्ही कमिटी मध्ये सदस्य पदाधिकारी हे सर्व तरुण, उद्योजक, वकील व डॉक्टर असे घेतले असल्यामुळे भविष्यात नक्कीच याचा फायदा समाजाला होईल असे सांगितले.

# अहमदनगर कॉलेजमध्ये वाणिज्य विभागाचा क्रीडा सप्ताह उत्साहात



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बी.पी.एच.ई. सोसायटीच्या अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथील वाणिज्य व संशोधन केंद्र विभागामार्फत क्रीडा सप्ताहाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि क्रीडाप्रेमी वातावरणामुळे संपूर्ण आठवडा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

क्रीडा सप्ताहाची सुरुवात धावण्याच्या स्पर्धेने (१०० मीटर रन) झाली. त्याच दिवशी बॉल पास रिले तसेच मुला-मुलींसाठी दोरखेच ( ) स्पर्धा घेण्यात आली.

तसेच विविध ''वन मिनिट गेम्स'' चे आयोजन करण्यात आले. यामध्ये सॅक रेस, थ्री लेग रेस, ऑक्टोपस रेस, बुक बॅलन्सिंग रेस आणि बॉटल इन सर्कल या स्पर्धांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

शॉटपुट स्पर्धा तसेच फिटनेस चॅलेंज (पुश-अप्स, क्रंचेस, प्लँक्स) घेण्यात आले. याशिवाय ''मोगॅम्बो खुश हुआ'' ही मनोरंजक स्पर्धाही विद्यार्थ्यांसाठी आकर्षण ठरली. या क्रीडा सप्ताहादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण व शारीरिक तंदुरुस्ती यांचा विकास झाला. सर्व विजेत्या स्पर्धकांचे कौतुक व अभिनंदन प्राचार्य व वाणिज्य विभाग प्रमुखांनी केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. नोएल पारगे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा स्पर्धा अत्यंत आवश्यक आहेत. शिक्षणाबरोबरच शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

वाणिज्य विभागाचे विभागप्रमुख सीए डॉ. परेश बोरा यांनी सांगितले की, ''क्रीडा सप्ताहामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्पर्धात्मक वृत्ती आणि एकोप्याची भावना वाढीस लागते. विभागामार्फत भविष्यातही अशाच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

प्रभारी प्राचार्य तसेच विभागप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली हा क्रीडा सप्ताह अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. या क्रीडा सप्ताह मध्ये महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थी तसेच सर्व प्राध्यापकवृंद यांचा सहभाग लाभला. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत पुढील वर्षी अधिक जोमाने सहभागी होण्याची तयारी दर्शविली.

# विद्यार्थ्यांनो तुमच्यातील कलाकार ओळख - बाबासाहेब सौदागर

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**पारनेर–** महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ चित्रपट गीतकार, अभिनेते, पटकथा लेखक मा. श्री. बाबासाहेब सौदागर म्हणाले की, विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात आपल्याला गुण कमी मिळाले तरी नाराज होऊ नका तुमच्यातील कलागुण ओळखा.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे, श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर. येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. बाबासाहेब सौदागर व अभिनेत्या सौ. कविता सौदागर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त मा. श्री. सिताराम खिलारी यांनी भूषविले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुखपाहुण्यांच्या हस्ते व्यासपीठाची पूजा करून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते व इतर कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विश्वास गवारी व प्रा. संकेत ठाणगे यांनी केले.

वार्षिक स्नेह संमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पूजनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकासासाठी अशा



उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ विश्वस्त मा. श्री. सिताराम खिलारी यांनी गुणवंत प्राध्यापक व विद्यार्थी यांचे अभिनंदन करून महाविद्यालयाचे व संस्थेचे नाव उज्वल करावे असे अवाहन केले.

समारंभात शैक्षणिक गुणवंत, क्रीडा स्पर्धांतील विजेते तसेच विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. गुणवंत प्राध्यापक, विद्यार्थी व पालकांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी महाविद्यालयात वर्षभर विविध विभागात राबविण्यात आलेल्या उपकेमांचे अहवाल वाचन केले. तर पारितोषिक व क्रीडा अहवालाचे वाचन प्रा. अनुराधा गायके व प्रा. दिव्या शीलवंत यांनी केले . सूत्रसंचालन डॉ. जिजाभाऊ घुले व प्रा. रेश्मा सोनावणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. वीरेंद्र धनशेट्टी यांनी मानले.याप्रसंगी कला शाखा प्रमुख डॉ. विजय सुरोशी, विज्ञान शाखा प्रमुख प्रा. नामदेव वाल्हेकर, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. सुदाम वीर, एन.सी.सी. प्रमुख प्रा. शांता गडगे, कार्यालयीन प्रमुख श्री. सावकार काकडे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# तिथीप्रमाणे शिवजयंतीनिमित्त शहरात १ मार्चला भव्य चित्रकला स्पर्धा

### शालेय विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन | 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंग' हा स्पर्धेचा विषय

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** तिथीनुसार शिवजयंतीचे औचित्य साधत शहरात १ मार्च रोजी भव्य चित्रकला स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग या विषयावर आधारित ही स्पर्धा होणार असून, शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

शिवसेना (एकनाथ शिंदे) विभाग प्रमुख तथा महानुभाव पुजारी महासभेचे संघटन मंत्री आर्कि. प्रणव अशोकराव भोसले यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण व्हावी, तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, शौर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्याच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीला वाव देत महाराजांच्या जीवनातील प्रसंग साकारावेत, असे आवाहन आर्कि. प्रणव भोसले यांनी केले आहे.

गट १: इयत्ता १ ली ते ४ थी व गट २: इयत्ता ५ वी ते ९ वी या दोन गटात ही स्पर्धा होणार आहे. दोन्ही गटांसाठी स्वतंत्रपणे विजेते निवडले जाणार असून प्रत्येक गटातील स्पर्धकांना समान संधी देण्यात येणार आहे. स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्यांसाठी अनुक्रम १०००/- , ७००/- व ५००/- रुपये रोख आणि मानपत्र, मानचिन्ह तसेच चतुर्थ क्रमांकाला मानपत्र व आकर्षक भेट वस्तू बक्षीस देण्यात येणार आहे.

स्पर्धेनंतर लगेचच परीक्षकांच्या उपस्थितीत निकाल जाहीर करून मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडणार आहे. ही चित्रकला स्पर्धा रविवार, दि. १ मार्च रोजी सकाळी ९:३० वाजता नगरकल्याण रोडवरील फॅमिली विश्व मॉल, उद्धव अॅकेडमी समोर आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे ठिकाण मध्यवर्ती असल्याने विद्यार्थ्यांनी वेळेआधी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेसंदर्भातील अधिक माहितीसाठी ७४९८९१९५७४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आयोजकांनी कळविले आहे.

# कॉलेजचे माजी विद्यार्थीनी दीक्षा कोरडे शास्त्रीय विभागात अव्वल




दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**पारनेर–** श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि कलागुणांना प्रोत्साहन देणारा हा सोहळा आनंदोत्सवाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून चित्रपट अभिनेते व कवी बाबासाहेब सौदागर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबत कला, क्रीडा व सामाजिक जाणीव जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे विश्वस्त सितारामजी खिलारी सर होते. प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य प्रा. वीरेंद्र धनशेट्टी, सांस्कृतिक विभाग प्रमुख कोठावळे सर, प्रा. अनुराधा गायके, प्रा. शीलवंत, डॉ. घुले (सूत्रसंचालन), प्रा. वीरेंद्र धनशेट्टी (आभार प्रदर्शन), शांता गडगे मॅडम, नामदेव वाल्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी दीक्षा कोरडे हिने शास्त्रीय विभागात प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाचा मान उंचावला. सध्या ती एलएलबीचे शिक्षण घेत असून कायद्याचे सखोल ज्ञान आत्मसात करत आहे. तिचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेष म्हणजे दीक्षा कोरडे या पत्रकार संतोष कोरडे यांच्या सुनबाई असून त्यांच्या कुटुंबासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन उत्कृष्ट पद्धतीने पार पडले. एकूणच वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा उत्साह, आनंद आणि गौरवाने अविस्मरणीय ठरला.

## (पान १ वरून) अहिल्यानगर महानगरपालिकेकडून १४ मार्चपर्यंत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये १०० टक्के सवलत

सरासरी १९ कोटी ७२ लाख रुपये महानगरपालिकेत जमा होतात. मात्र, कर्मचारी वेतन, निवृत्तीवेतन, पाणी योजना व पथदिव्यांची वीज बिले आणि इतर अत्यावश्यक सेवांचा मासिक खर्च सुमारे २४ कोटी ४० लाख रुपयांवर गेला आहे. यामुळे दर महिन्याला महानगरपालिकेला ४ कोटी ६८ लाख रुपयांचा तुटवडा भासत असून देणीही वाढत आहेत. सद्यस्थितीत महानगरपालिकेला २३० कोटींची देणी आहेत. यात कर्मचारी ७ वा वेतन आयोग फरक १०७ कोटी, विकास कामांची देयके ८० कोटी, कुत्र्यांचा बंदोबस्त करणे ५० लाख, विविध योजनांचा मनपा हिस्सा ५० कोटी, पाणी पुरवठा वीज बिल १६.८५ कोटी, इतर देयके ९ कोटी, न्यायालयीन प्रलंबित देयके ९ कोटी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी () रक्कम ७ कोटी, पुरवठादार देयके ४ कोटी, अशुद्ध पाणी आकार ४ कोटी, वेतन कपात रक्कम ३.५० कोटी. ६ वा वेतन आयोग फरक ३.०० कोटी, ५ वा वेतन आयोग फरक २ कोटी, सेवा उपदान रक्कम २ कोटी, परिभाषित निवृत्तीवेतन हिस्सा १.७५ कोटी, अर्जित रजा वेतन रक्कम ७५.०० लाख, कर्मचारी वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके ५०.०० लाख, स्ट्रीट लाईट वीज बिल ४८.०० लाख आदींचा समावेश आहे. महानगरपालिकेचे उत्पन्नाचे प्रमाण कमी आणि अत्यावश्यक सेवांचा खर्च जास्त असल्याने आर्थिक नियोजन करताना मोठी कसरत करावी लागत आहे. वाढत्या कराच्या थकबाकीमुळे दंडाची रक्कमही वाढत आहे. परिणामी महानगरपालिकेसह नागरिकांवरही दंडाचा बोजा पडत आहे. या सर्वांचा विचार करून नागरिकांना कराच्या थकबाकी वरील शास्तीमध्ये १४ मार्चपर्यंत १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी थकबाकीदारांना थकीत कर एकरकमी जमा करावा लागणार आहे. थकबाकीदार नागरिकांनी या सवलतीचा लाभ घेऊन त्यांच्याकडे थकीत असलेल्या कराचा भरणा तत्काळ करावा, असे आवाहन आवाहन आयुक्त डांगे यांनी केले आहे. दरम्यान, महानगरपालिकेकडून दवर्षी शास्तीमध्ये सवलत जाहीर करत आहे. तरीही अनेक थकबाकीदार मालमत्ताधारक मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकबाकी भरण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. आता पुन्हा शास्तीमध्ये सवलत देण्यात आली असून, थकबाकीदारांनी याचा लाभ घेऊन थकीत कर भरावा. अन्यथा येत्या काळात महानगरपालिकेला नाईलाजाने थकबाकीदारांवर जप्ती, नळ कनेक्शन तोडून पाणी पुरवठा बंद करणे, अशा कारवाया कराव्या लागतील, असा इशाराही आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

## खून करून फरार झालेल्या आरोपीस २४ तासांत जेरबंद

बालानगर, डोंणगाव तांडा, टेकडी तांडा, दरेगाव, सुंदवाडी, मुकुंदवाडी आदी भागांत शोधमोहीम राबवून संशयितास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपी केशवराव छगन चव्हाण याने गुन्ह्याची कबुली दिली. दारूच्या नशेत अहमद पठाण व आरोपी यांच्यात वाद झाला. वाद वाढताच अहमदने आरोपीच्या हाताला चावा घेतला. संतापाच्या भरात आरोपीने जवळील दगडाने अहमदच्या डोक्यावर वार केला. गंभीर दुखापतीमुळे अहमदचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला होता. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीस २४ तासांच्या आत अटक केली आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक श्री. विनायकुमार राठोड, अपर पोलिस अधीक्षक श्रीमती अन्नपूर्णा सिंग, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक ईश्वर जगदाळे व त्यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.